# ज्ञान प्रबोधिनी

सौर ज्येष्ठ १९४७ चे मासिक वृत्त
सौर आषाढ १, शके १९४७
दि. २२/६/२०२५

★ ज्ञान प्रबोधिनीच्या तिसऱ्या भवितव्य लेखाचे 'विस्तार' हे साध्यसूत्र आहे. त्याची चार मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे समावेशकता, नवोन्मेषता, सेतुबंधन व प्रभाव. त्या अनुषंगाने माहे सौर **वैशाखचे** मासिक वृत्त. ★

## प्रकट चिंतन

गेल्या दोन आठवड्यांमध्ये सोलापूर व चिपळूण येथे प्रतिज्ञाग्रहणाचे कार्यक्रम झाले. प्रथम प्रतिज्ञेमध्ये आपला हिंदू धर्म, हिंदू संस्कृती, हिंदू समाज म्हणजेच आपले राष्ट्र यांची सेवा करण्याचा उल्लेख आहे. यापैकी हिंदू संस्कृतीची चार लक्षणे प्रबोधिनीच्या संस्थापकांनी सांगितली आहेत. १) कोणाची उपासना करायची याचे स्वातंत्र्य असणे, २) उपासना कशी करायची याचे स्वातंत्र्य असणे, ३) दृश्य जगावर विजय मिळवण्याची इच्छा असणे आणि ४) आपल्या मन-बुद्धीवर नियंत्रण मिळवून आपल्या आत्म्याचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करणे, ही ती चार लक्षणे आहेत. यातले तिसरे लक्षण - दृश्य जगावर विजय मिळवण्याची इच्छा, कुठे व कशी दिसते हे बघण्यासारखे आहे.

**भविष्याविषयीचा विचार**

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्या दिवशीच योगी अरविंदांनी फाळणी पुसली जाणे, आफ्रिका-आशियातील इतर देशांना स्वातंत्र्य मिळणे, जागतिक स्तरावर देशांचे ऐक्य होणे, भारताने जगाला अध्यात्म शिकवणे, अशी स्वप्ने मांडली होती. यातले शेवटचे स्वप्न विवेकानंदांनी पण मांडले होते. दयानंदांनी हेच स्वप्न, 'कृण्वन्तो विश्वम् आर्यम्', म्हणजे 'आम्ही साऱ्या जगाला सुसंस्कृत बनवणारे होऊ', अशा भाषेत मांडले होते. समर्थ रामदासांनीही 'सृष्टिमधें भगवद्‌भजन। वाढवावें।।' असे सांगून हेच स्वप्न मांडले आहे. जगातील सर्व लोकांमध्ये काही बदल घडवणे हा दृश्य जगावर विजय मिळवण्याचा एक मार्ग आहे.

हे स्वप्न पूर्ण होण्यापूर्वी भारत विकसित देश झाला पाहिजे. स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवापर्यंत भारत असा देश व्हावा असे उद्दिष्ट म्हणजेही दृश्य जगावर विजय मिळवण्याचाच एक भाग आहे.

**दृश्य जगतावर वर्तमान काळातील विजय**

काळाच्या मोठ्या पटावर स्वातंत्र्यानंतरची ७७ वर्षे म्हणजे वर्तमानकाळच आहे. सध्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात भारत जगात चौथ्या स्थानावर आहे. लोकसंख्येत जगाच्या पहिल्या क्रमांकावर असूनही अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आहे. शास्त्रीय संशोधन, वैद्यकीय सेवा, लष्करी साहित्याचे उत्पादन, औषध निर्माण, संगणक तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रातली प्रगती दृश्य जगावर विजय मिळवत गेल्याचेच दर्शवते. रेल्वे, हमरस्ते, पूल, नदीजोड प्रकल्प अशा अनेक आघाड्यांवर दृश्य जग जिंकण्याचे प्रयत्न चालू आहेत. भारतीयांनी स्थापन केलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणि दक्षिण ध्रुवावरील संशोधन केंद्रे ही देखील विजयचिन्हेच आहेत. या सगळ्या विजयांमधून मिळवलेल्या कमाईचे सर्वांमध्ये न्याय्य वाटप किंवा वितरण करण्याच्या व्यवस्था बसवणे हा दृश्य जगावर विजय मिळवण्याचा पुढचा टप्पा असेल.

**दृश्य जगतावर विजयाच्या इतिहासातील खुणा**

भगवान बुद्धांचा संदेश आणि रामायण कथेचा आशियाई देशांमध्ये झालेला प्रसार आणि त्याच्या आजही दिसणाऱ्या खुणा दृश्य जगावर विजय दाखवणाऱ्याच आहेत. योग, आयुर्वेद, चौदा विद्या आणि चौसष्ट कला, ज्योतिष, धातुशास्त्र, वस्त्रोद्योग अशा विविध प्रकारे दृश्य जगावर विजय मिळवणे इतिहासात शक्य झाले. वास्तुशास्त्र, शिल्पकला, प्लॅस्टिक सर्जरी, लसीकरण हे सर्व भारतात ब्रिटिश राज्य येईपर्यंत प्रचलित होते. दृश्य जगावर मिळवलेला विजय टिकवण्यासाठी लागणारी संघटनविद्या, राष्ट्रीय चारित्र्य, तोफा-बंदुका बनवण्याची आधुनिक तंत्रे, यात मात्र आम्ही कमी पडलो. इतिहासातील चुका टाळून, वर्तमानातील आव्हाने पेलून आणि भविष्यातील नवनिर्मिती करून दृश्य जगावर विजय मिळवणे हा हिंदू संस्कृतीची सेवा करण्याचा एक सर्वांना दिसणारा मार्ग आहे.

– गिरीश श्री. बापट

**राज्याभिषेक गड मोहिम – युवक विभाग**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५१ वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी 'चला राजगड' या दुर्गभ्रमण मोहिमेचे आयोजन केले होते. वय वर्षे १० ते १५ वयोगटातील २३२ मुले व ज्ञान प्रबोधिनीचे ३९ मार्गदर्शक अशा तब्बल २७१ जणांनी ह्या मोहिमेमध्ये सहभाग घेतला.

**साठवण टाकी** – इगतपुरी तालुक्यातील भावली खुर्द-तांबडमाळ तसेच इंदोरे (खाडे वस्ती) येथेही १५ हजार लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाक्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. यात स्थानिक ग्रामस्थांनी श्रमकार्य केले. नाशिक जिल्ह्यातील कामे ही प्रामुख्याने आदिवासी जनजाती समाजासाठी करण्यात येत आहेत.

**व्यक्तिमत्त्व विकास केंद्र** – वडारवाडी इथे एकूण ४३ मुलांचे शिबिर झाले. यामध्ये बालविकास, आंनदी शिक्षण, दल यांमधील सगळी मुले एकत्र होती व एकूण ७ ताई शिबिरात सहभागी होत्या. यांमध्ये पद्य, अंभग, आकारावरून चित्र काढण्यास सांगितले व इयत्तेनुसार विषय देऊन नाटक सादरीकरण केले.

**कार्यशाळा**–DISOM या संस्थेद्वारे सामाजिक - राजकीय क्षेत्रात नेतृत्व करू इच्छिणाऱ्यांसाठी चालू असलेल्या उपक्रमामध्ये 'Critical Thinking' डेहराडून, बोधिग्राम येथे चार दिवसांची कार्यशाळा घेतली. देशभरातील विविध राज्यांमधून (मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा, मणिपूर, झारखंड, आसाम, कर्नाटक, केरळ, गुजरात, जम्मू आणि काश्मिर व उत्तर प्रदेश) वैविध्यपूर्ण पार्श्वभूमी असलेल्या २३ जणांनी (वयोगट २२ ते ४७ वर्षे) या कार्यशाळेत सहभाग घेतला.

**प्रदेश विकसन :** या वर्षी जलसंधारण जलतारा प्रकल्पात सय्यद हिप्परगा, वाडी वडगाव आणि हराळी या गावांमध्ये अनुक्रमे १०७, १३६ आणि ११ जलतारा पूर्ण झाले आहेत. परिसरात पाऊस चांगला झाल्यामुळे याचा चांगला उपयोग नक्की झाला आहे.

**पुरस्कार**– स्वराज प्रतिष्ठान व हुतात्मा बाबू गेनू स्मारक समिती यांच्या वतीने, शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने, दादर, मुंबई, येथे पद्मश्री डॉक्टर तात्यासाहेब लहाने यांच्या हस्ते श्री. प्रकाश रणनवरे यांना शिक्षणक्षेत्रातील सेवेसाठी **महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कार** देण्यात आला.

## ★ समावेशकता ★

### ❖ नेतृत्व संवर्धन केंद्र

सौर ज्येष्ठ १० (३० मे) रोजी पुरंदर तालुक्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिका प्रशिक्षण सत्र सासवड येथे घेण्यात आले. सत्रासाठी एकूण सहा पर्यवेक्षिका सहभागी झाल्या होत्या. हे सत्र सौ. संध्या खामकर यांनी आयोजित केले होते.

★ **सत्र उद्दिष्ट :**

१. पर्यवेक्षिका म्हणून बरोबर असलेल्या २० अंगणवाडी सेविकांचे नेतृत्व करण्याची इच्छा निर्माण होणे.
२. गटातील सदस्यांशी व अधिकाऱ्यांशी संवाद करताना येणाऱ्या अडथळ्यांची जाणीव होऊन त्यावर आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण सुरू करणे.
३. पुढाकार घेऊन काम करण्याची प्रेरणा वाढणे.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

मे आणि जून मध्ये इ. आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्व-अभ्यास कौशल्य शिबिरे आयोजित केली होती. या दोन्ही शिबिरांत मिळून ६८ मुले-मुली सहभागी झाली होती. यात उद्दिष्ट निश्चिती, वेळेचे नियोजन, वेळापत्रक, टिपणे काढणे, वाचन कौशल्ये, SQ4R अभ्यास पद्धती, गणिताच्या अभ्यासातील महत्त्वाचे मुद्दे या उद्दिष्टांवर काही खेळ आणि activity घेतल्या गेल्या.

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**नवीन पाच वस्त्यांमध्ये अनुभवशाळा प्रकल्पाचा विस्तार** – किष्किंदा नगर (कोथरूड), सुतारदरा (कोथरूड), वैदुवस्ती (हडपसर), मार्कंडेय नगर (हडपसर), आणि वैदुवस्ती (चतु:श्रृंगी) येथे सर्वेक्षणानंतर सौर ज्येष्ठ २६ (१६ जून) पासून नियमित वर्गांची सुरुवात झाली.

### ❖ हराळी केंद्र

**युवती शिबिर :** हराळी परिसरात काम करताना अविवाहित युवतींना घराबाहेर पाठवण्यासाठी पालकांचा नकार हा सगळ्यात मोठा अडथळा असतो. या युवतींना देखील नवीन अनुभव घेण्याची संधी मिळावी या हेतूने सौर ज्येष्ठ १९ ते २३ (९ ते १३ जून) या काळात युवतींसाठी हराळी केंद्रावर निवासी शिबिर आयोजित करण्यात आले. यात १५ युवतींनी सहभाग घेतला. • **सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.**

## ★ नवोन्मेशता ★

### ❖ नेतृत्व संवर्धन केंद्र

★ **सामाजिक नेतृत्वगुण विकसन :**

**अग्रदूत प्रकल्प** – सामजिक प्रकल्प सादरीकरण केलेल्या सहभागी विद्यार्थ्यांमधील सहा सदस्यांची निवड ही प्रकल्पाच्या पुढील टप्पा-४ म्हणजेच आंतरवासितेसाठी झाली. स्नेहल रोडगे ही विद्यार्थिनी वेल्हे केंद्रात मा. सुवर्णाताई व प्रतिभाताई यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्री-शक्ती विभागात सौर वैशाख २० ते ज्येष्ठ २० (१० मे ते १० जून) या कालावधीसाठी रुजू झाली होती. तसेच अदिती नागवे ही विद्यार्थिनी मा. गिरीश कुलकर्णी व मा. संगीताताई यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर येथे स्नेहालय संस्थेत सौर ज्येष्ठ १२ ते २० (२ ते १० जून) या कालावधीसाठी गेली होती.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

कॉसमॉस बँकेच्या भारतातील विविध शहारांमधील कार्यरत २५ वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी नेतृत्व कौशल्ये ह्या सूत्रावर आधारित दीर्घ प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात झाली. हा प्रशिक्षण कार्यक्रम सहा महत्त्वाच्या विषयांवर आधारित असून दोन महिन्यांच्या काळात पूर्ण होणार आहे. यातील पहिले मोड्यूल 'कार्य जीवन संतुलन' या विषयावर झाले.

### ❖ सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र

★ **अभ्यासक्रम –**

• Critical Thinking अभ्यासक्रम – डेक्कन ए. सो. पुणे विद्यापीठ बी.ए. मानसशास्त्र पहिल्या वर्षाच्या ७१ विद्यार्थ्यांसाठी 'Critical Thinking for Effective Learning' हा दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम (३० तास) राबविण्यात आला. एक तासाची २४ प्रत्यक्ष सत्रे व सहा तास स्वाध्याय अशी अभ्यासक्रमाची रचना होती. सत्रे संवादी पद्धतीने व वैविध्यपूर्ण उपक्रम करत घेण्यात आली. Google classroom द्वारे गृहपाठ देऊन मूल्यमापन केले गेले.

• Critical Thinking अभ्यासक्रम DGV College, Chennai – सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्राच्या वतीने 'डी.जी.व्ही. चेन्नई कॉलेज पत्रकारिता' बी.ए., एम.ए. सर्व वर्षांच्या निवडक ५० विद्यार्थ्यांसाठी दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम (३० तास) राबवण्यात आला. पंधरा तासांची प्रत्यक्ष कार्यशाळा, अकरा तासांची दूरस्थ सत्रे आणि चार तास स्वाध्यायासाठीचे उपक्रम असे अभ्यासक्रमाचे स्वरूप होते. Google classroom द्वारे गृहपाठ व दूरस्थ परीक्षेच्या माध्यमातून मूल्यमापन केले गेले.

## ★ सेतुबंधन ★

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

• सेवा सहयोग संस्थेद्वारा आयोजित समुत्कर्ष प्रकल्पा अंतर्गत सक्षम युवा, सशक्त राष्ट्र या विषयाबाबत सत्राचे आयोजन करण्यात आले होते. ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेतील मानस तज्ज्ञांनी इयत्ता नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांना ध्येय निश्चिती, व्यसन परावृत्ती आणि मैत्री या तीन संकल्पना खेळ, चित्रफीत, नाटुकले आणि गोष्टीच्या साहाय्याने समजावून सांगितल्या. या शिबिरात इ. नववीचे ९४ आणि दहावीचे ६४ विद्यार्थी आणि विद्यार्थिनी सहभागी होते.

• आनंदी जीवन ट्रस्ट या संस्थेच्या वतीने शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्याच्या उद्देशाने एक विशेष मुलाखत प्रक्रिया राबविण्यात आली. एकूण ९५ विद्यार्थ्यांनी या मुलाखतीस उपस्थिती लावली. हे सर्व विद्यार्थी इयत्ता दहावीचे व बारावीचे होते. या प्रक्रियेसाठी प्रारंभी ६० प्रश्नांची एक सखोल प्रश्नावली तयार करण्यात आली होती.

## ★ प्रभाव ★

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

गंगा एज्युकेशन सोसायटीचे ज्ञानगंगा विश्वविद्यालय शिरूर, जिल्हा पुणे यांनी आयोजित केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या वर्गाला प्रकाश रणनवरे यांनी क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम, पंचकोश विकसन या विषयी मार्गदर्शन केले. एकूण ५० शिक्षक उपस्थित होते.

सौर ज्येष्ठ २२ व २३ (१२ व १३ जून) असे दोन दिवस विद्यावर्धिनी विद्यालय, अहमदपूर, लातूर येथे पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण वर्गात नवीन शैक्षणिक धोरण अभ्यासक्रम, सवंगडी पेटी इ. विषयी मार्गदर्शन केले. एकूण ३० शिक्षक उपस्थित होते.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

**विद्याभवन, पुणे येथे अध्यापक प्रशिक्षण (अन्य शालेय अध्यापकांसाठी प्रशिक्षण)** – भारतीय विद्याभवन येथे मा. प्राचार्य मिलिंद नाईक यांनी नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण केंद्रित विषयांची मांडणी करताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि त्यानुसार वर्गातील अध्यापनाचा बदलता दृष्टिकोन याबद्दल मांडणी केली. पंचकोश संकल्पनेबद्दल मा. आदित्य शिंदे यांनी मांडणी केली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून अपेक्षित विषयश: बदलांबद्दल – अध्यापन पद्धती आणि मूल्यमापन याबद्दल विषयश: स्वतंत्र सत्रे झाली. यामध्ये वाच. मुकुलिका थत्ते, प्रा. हृषीकेश कुलकर्णी (विज्ञान), प्रा. रागिणी नाईक (इंग्रजी), प्रा. वर्षा पुराणिक (गणित), प्रा. जयश्री काटीकर (मराठी, हिंदी, संस्कृत), प्रा. श्रेयश फापाळे (सामाजिक विज्ञान) यांनी साधन व्यक्ती म्हणून काम पाहिले.

## ★ विभागांचे चालू कामाचे वृत्त ★

### ❖ ग्राम विकसन विभाग

**पाणी साठवण टाकी बांधकाम :**

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील माले–आखाडेवस्ती आणि माले–कातकरीवस्ती येथे १५ हजार लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाक्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील शेनवड (शिवाची वाडी) व भावली खुर्द (धारवाडी) येथे १५ हजार लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाक्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. या चारही साठवण टाक्यांना एव्हियंट मटेरिअल्स इंडिया प्रा. लि. यांचे अर्थसाहाय्य लाभले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील फडतरी गावातील गावठाण (सिद्धनाथ मंदिर) या ठिकाणी १५ हजार लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाक्या बांधण्याचे काम ग्रामस्थांच्या सहभागातून नुकतेच पूर्ण करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ शनिवारवाडाच्या सदस्या मीराताई भरवीरकर यांच्या देणगीतून ही टाकी बांधण्यात आली आहे.

**साठवण टाकी लोकार्पण कार्यक्रम :**

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील भावली खुर्द ग्रामपंचायतीमधील तांबडमाळ या आदिवासी वस्तीत ज्ञान प्रबोधिनी संस्थेतर्फे बांधण्यात आलेल्या जलकुंभाचे लोकार्पण रोटरी क्लब ऑफ नाशिक ग्रेप सिटीच्या अध्यक्षा मधुवंती सिधये यांच्या हस्ते पार पडले.

### ❖ नागरी वस्ती अभ्यासगट

**शिक्षक प्रशिक्षण –** सलग तीन वर्षे विश्वकर्मा शाळा, अप्पर इंदिरा नगर येथे विद्याव्रताच्या तासिका, शिबिरे, मेळावे, संस्कार आपण घेतले आहेत. शाळेच्या मागणीनुसार विद्याव्रत तासिका शिक्षकांनी घेण्यासाठी, सौर ज्येष्ठ १५ व १६ (५ व ६ जून) या दोन्ही दिवशी प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणात इंग्रजी माध्यम – मराठी माध्यमांचे मिळून ५३ शिक्षक तसेच दोन्ही माध्यमांचे मुख्याध्यापक पूर्ण वेळ उपस्थित होते.

### ❖ निगडी केंद्र

**अध्यापक प्रशिक्षण शिबिर**

निगडी केंद्राची अंतर्गत गुणवत्ता वाढवणे आणि ती टिकवणे या उद्देशाने केंद्रात दर वर्षी अध्यापक प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. यात केंद्रातील सर्व अध्यापक आणि काही सत्रांसाठी शिक्षकेतर सदस्य उपस्थित होते. यात वाचनसंस्कार, वार्षिक नियोजन, विभागशः नियोजन, संकल्पलेखन, नवीन वास्तूची संकल्पना, सुट्टीतील दौरे, अभ्याससहली यांची मांडणी अशा विषयांवर एकूण १६ सत्रांचे आयोजन केले होते. ज्ञान प्रबोधिनीचे संचालक यांच्या वैचारीकाचाही यात समावेश होता. (• **सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.**)

## ❖ छात्र प्रबोधन

विकासमित्र प्रकल्पांतर्गत शाळांमध्ये सुरू असलेल्या विकासिका तासिकांमध्ये 'छात्र प्रबोधनच्या अंकांचा प्रभावी वापर' कसा होऊ शकेल, असे शिक्षण दूतांसाठी सत्र घेण्यासाठी शिल्पा कुलकर्णी, स्मिता गुजर या वेल्हे केंद्रात गेल्या होत्या.

## ❖ नेतृत्व संवर्धन केंद्र

**अरुणाचल प्रदेश व आसाम अभ्यासदौरा**

सौर वैशाख २० ते ज्येष्ठ ५ (१० ते २५ मे) दरम्यान नेतृत्व संवर्धन केंद्रातील बारा विद्यार्थी व एक मार्गदर्शक यांचा आसाम व अरुणाचल प्रदेश अभ्यासदौरा झाला. याच्या निवेदन बैठकीला प्रमुख अभ्यागत म्हणून मा. वामन पारखी (सीमावर्ती राज्ये संपर्क गट) व मा. महेन्द्रभाई (कार्यवाह) उपस्थित होते. सुरुवातीला व्यक्तिगत मनोगत लेखन, गटशः निवेदने/सादरीकरणे व अभ्यागतांचे मार्गदर्शन असे बैठकीचे स्वरूप होते.

## ❖ युवक विभाग, पुणे

**संशोधनात्मक प्रकल्प पद्धती शिबिर**

पुण्यात एकाच वेळी दोन ठिकाणी ही शिबिरे झाली. सौर वैशाख ३१ ते ज्येष्ठ ५ (२१ ते २५ मे) यादरम्यान ज्ञान प्रबोधिनी वास्तू, पुणे येथे संशोधनात्मक प्रकल्प पद्धती शिबिर (भाग १) आयोजित केले होते. इथल्या शिबिराची जबाबदारी डॉ. होमी भाभा दलाने घेतली होती. यात निवासी व अनिवासी मिळून २८ विद्यार्थी व नऊ युवक मार्गदर्शक सहभागी झाले होते. शिबिरात नेहमीप्रमाणे गटकार्य, निरीक्षण, प्रश्न कौशल्य, चल विश्लेषण, प्रयोग रचना, विदा विश्लेषण ही संशोधानासाठी आवश्यक विषयांची सत्रे होती.

त्याशिवाय यांनी भारताची विज्ञान-तंत्रज्ञानातील वाटचाल या विषयावर सत्र, माहितीपट, विज्ञानावर आधारित खजिन्याचा खेळ अशी सत्रेही ठेवली होती. शिबिराच्या चौथ्या दिवशी श्री. संतोष गोंधळेकर यांच्या प्रयत्नातून सुरू झालेल्या पिरंगुट येथील प्रकल्पाला विद्यार्थी व मार्गदर्शकांनी भेट दिली. शिबिराचा समारोप विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण आणि मनोगत यांनी झाला.

**बालशिक्षण मंदिर, कोथरूड शिबिर –**

इथे झालेल्या शिबिराची जबाबदारी डॉ. विक्रम साराभाई दलाने घेतली होती. हे शिबिर दोन भागांमध्ये घेतले गेले. भाग १ मध्ये दोन दलांमध्ये परस्परसंबंध आहे का व तो कसा आहे?(correlation) हे शोधायला मुले शिकली. तर भाग २ मध्ये दोन दलांमध्ये परस्परसंबंध का आहे?(causal mechanism) या प्रश्नाचे उत्तर मुलांनी शोधले. गटकार्य, visualisation सत्र, dissection सत्र, हायड्रोजन गॅसचे प्रयोगाचे सत्र झाले. विविध माहितीपटांमुळे जिज्ञासा वाढली. शिबिराच्या चौथ्या दिवशी ''Selfie with Science'' नावाचा खेळ घेण्यात आला. गटांमध्ये काम करून मुले शाळेच्या परिसरात scientific clues शोधत होती. शेवटी सादरीकरण व पालकांचे संवाद रंगले.

**स्वयंअध्ययन कार्यशाळा २०२५** – जून महिन्यात पाच दिवस दररोज अडीच तास विविध शाळांमध्ये शिकणाऱ्या दहावीतील ३० युवकांसाठी स्वयंअध्ययन कार्यशाळा घेण्यात आली. सध्या प्रशालेत अध्यापक म्हणून जबाबदारी घेतलेल्या युवक विभाग सदस्यांनी या कार्यशाळेत सत्रे घेतली.

**श्रमदान** – मुळशी येथील हिवाळी वस्ती या दुर्गम गावात नैसर्गिक संसाधने विभागातर्फे टाकीचे काम चालू आहे. या टाकीच्या बांधकामात मदत म्हणून श्रमदान करायला मार्गदर्शक गटातील एकूण बारा युवकांनी दोन टप्प्यांत श्रमदान केले.

## ❖ शिक्षक प्रशिक्षण केंद्र

सौर ज्येष्ठ १५ ते १७ (५ ते ७ जून) या कालावधीत लोकमान्य टिळक शिक्षण समिती, उज्जैन यांच्या प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन अध्यापकांसाठी संवाद ते समुपदेशन, अध्ययन निष्पत्ती आणि अध्ययन अनुभव योजना व चिंतनशील अध्यापक या विषयांवर कार्यशाळा घेण्यात आल्या.

द्वारकादास गोवर्धनदास वैष्णव महाविद्यालय, चेन्नई यांच्या चारशे अध्यापकांसाठी अध्यापकाची प्रेरणा या विषयावर प्रा. प्रशांत दिवेकर यांनी कृती सत्र घेतले.

**आचार्य व्रत शिबिर –** तिसऱ्या तुकडीतील सोळा जणांनी शैक्षणिक लेखांचे वाचन, चर्चा आणि अभ्यास करून चार दिवस चिन्मय माऊली आश्रम, लोहगाव या ठिकाणी या गटाच्या निवासी शिबिरात आचार्य व्रताची दीक्षा घेतली. **• सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.**

## ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**Learn Skill प्रकल्प –** कास्प, पुणे संस्थेबरोबर या नव्या उपक्रमाची सुरुवात झाली. सौर ज्येष्ठ १५ (५ जून) रोजी वाचन आणि लेखन या विषयावर वस्तीत शिकविणाऱ्या १८ तायांचे प्रशिक्षण घेण्यात आले. हडपसर येथे इयत्ता १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन कौशल्य वर्गाची सुरुवात उद्दिष्ट निश्चिती सत्राने झाली. तसेच ८वी व ९वीतील विद्यार्थी गटासाठी विज्ञान संकल्पना अध्यापनातून ध्वनी व दाब या संकल्पना कृतियुक्त अध्यापनाने शिकविण्यात आल्या. एकूण १५० विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

**• शिक्षणदूत प्रशिक्षण वर्ग व कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाचे सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.**

**LearnEng प्रकल्प (हुबळी प्रशिक्षण)** – प्रकल्पात येत्या शैक्षणिक वर्षामध्ये वेल्हे भाग तसेच हराळी भागातील साधारण बारा नवीन शाळांचा समावेश करण्याचा मानस आहे. याकरिता बारा नवीन शिक्षणदूतांची मुलाखत आणि चाचणीद्वारे निवड करण्यात आली. या सर्वांचे सौर ज्येष्ठ १२ ते २६ (२ ते १६ जून) दरम्यान हुबळी, कर्नाटक येथील देशपांडे फौंडेशनमध्ये निवासी प्रशिक्षण घेण्यात आले. यामध्ये आशय, अध्यापन पद्धती, वर्ग व्यवस्थापन तसेच इतर तांत्रिक बाबींचा समावेश करण्यात आला. जुलै महिन्यापासून हा गट विविध शाळांत तास घेईल.

## ❖ संस्कृत-संस्कृति-संशोधिका (संत्रिका)

संस्कृत-संस्कृति-संशोधिकेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त सौर ज्येष्ठ १३ (३ जून) पासून, संत्रिकेच्या स्थापनेपासून म्हणजे २२ जुलै १९७५ पासूनच्या कार्याचा इतिहास रोज एक लेख याप्रमाणे संत्रिका विभागाच्या वेबसाईटवर व संत्रिका सुवर्ण महोत्सव या व्हॉट्स ॲप गटावर

पाठवला जात आहे. सौर आषाढ ३१ (२२ जुलै) पर्यंत ५० लेख यानिमित्ताने पाठविण्यात येणार आहेत. यात ध्वनिचित्रफिती/ ध्वनिमुद्रित लेख यांचाही समावेश असणार आहे.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त गीता धर्म मंडळ पुणे येथे, सौर ज्येष्ठ ५ ते १० (२६ ते ३१ मे) या कालावधीत स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. त्या व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प संत्रिकेच्या पुरोहिता वाच. सुजाताताई बापट यांनी गुंफले. 'स्वातंत्र्यवीर सावरकरांची काव्यसृष्टी' या विषयाची त्यांनी मांडणी केली.

**• मातृभूमिपूजन व गणपतीपूजन – अभिषेक व अथर्वशीर्ष पठण या वेगळ्या कार्यक्रमाचे वृत्त छायाचित्राला जोडले आहे.**

## ❖ संवादिनी

**उमलत्या वयाशी जुळवून घेताना प्रशिक्षक प्रशिक्षण** – तीन दिवसीय प्रशिक्षण वर्गात चौदा प्रशिक्षणार्थी उपस्थित होत्या.

**ऊर्जा प्रकल्प** – या प्रकल्पांतर्गत उमलत्या... ची पहिली कार्यशाळा झाली. यामध्ये सौर ज्येष्ठ २६ व २८ (१६ व १८ जून) ला १०वीच्या वर्गासाठी उमलत्याचे सहा विषय व सौर ज्येष्ठ २७ (१७ जून) या दिवशी ९वी साठी तीन विषय मांडले.

**कौशल्य गट** – ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूल आंबेगाव येथे वीस शिक्षकांसाठी प्रशिक्षण घेतले.

## ❖ सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र

**संशोधन आंतरवासिता प्रकल्प (Internship projects)**

उन्हाळी सुट्टीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी संशोधन आंतरवासिता (Research Internship) घोषित करण्यात आली होती. पंधरा जणांच्या मुलाखती होऊन पाच जणांची दोन महिन्यांच्या प्रकल्पासाठी निवड करण्यात आली. प्रकल्पांचे विषय 'समावेशक विकास (inclusive growth)', 'वित्तीय संघराज्यवाद आणि विकेंद्रीकरण (Fiscal Federalism and decentralization)', 'केंद्रीय अर्थसंकल्प विश्लेषण (Union budget Analysis)', 'भारत–चीन व्यापारी संबंध (India-China Trade Relations)', 'कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी जाणीव, सर्जनशीलता आणि शिक्षण (AI, consciousness, creativity and education)' या संदर्भातले आहेत.

## ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण

**त्रिदशकपूर्ती** – सौर ज्येष्ठ १७ (७ जून) या दिवशी वेल्ह्यातील वास्तूमध्ये त्रिदशकपूर्तीचा समारोप झाला. त्रिदशकपूर्ती निमित्ताने २०२४–२५ या वर्षात २१ कार्यक्रम घेतले. त्याची मा. संचालकांना निवेदने झाली आणि वर्षारंभ उपासना झाली. या वर्षात विभागाचे काम २४ प्रकल्पाद्वारे होणार आहे. याची रचना म्हणून दरमहा ३५ मासिक बैठका असणार आहेत. सर्व बैठकांमध्ये मिळून जबाबदारी घेणाऱ्या १३८ जणी यात सहभागी असतील. या बैठक सदस्य यादीचे वाचन झाले. हे काम १०३ गावांत नियमित तर आठ गावांत प्रासंगिक चालणार आहे. मा. संचालकांनी अहिल्याबाईंचे चरित्र सांगून त्यातून आपण काय शिकायचे याचे गटाला मार्गदर्शन केले. या दिवसभरच्या कार्यक्रमाला पाऊस असूनही ९५ जणी पूर्ण वेळ उपस्थित होत्या.

**योगोपचार शिबिर**

सौर ज्येष्ठ १० (३१ मे) रोजी आंबवणे येथे योगोपचार शिबिर झाले. त्या शिबिरात 'कमवा व शिका' मधील २२ युवती, तीन हिरकणी, आणि आठ कंबर, गुडघे, पाठ दुखीचे रुग्ण उपस्थित होते. सुरुवातीला स्नायूंना ताण देणे आणि मोकळे करणे असे व्यायाम प्रकार सगळ्यांना शिकवले. त्यानंतर गुडघा, कंबर आणि खांदे यांची रोप/बेल्ट थेरपी सर्व रुग्णांना दिली.

## ❖ स्पर्धा परीक्षा केंद्र

**देहरादून – दिल्ली – अलवर – जयपूर दौरा :** वाच. विवेकराव कुलकर्णी आणि वाच. सविताताई कुलकर्णी यांचा देहरादून येथे अधिकारी भेटी आणि बोधिग्राम येथे डीसॉम संस्थेबरोबर Critical Thinking ची कार्यशाळा यासाठी पाच दिवसीय दौरा झाला. आणि त्यानंतर दिल्ली–अलवर–जयपूर असा चार दिवसांचा दौरा झाला. एकूण दौऱ्यात सोळा IAS, नऊ IFO (भारतीय वन सेवा), सहा IPS, अकरा CAPF (CISF, CRPF, BSF) आणि अन्य केंद्रीय सेवा अधिकारी असे एकूण ७२ अधिकारी, २४ कुटुंबीय, माजी विद्यार्थी, अन्य क्षेत्रांतील तेरा तज्ज्ञ अशा सर्वांच्या भेटी झाल्या. **• सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.**

**Complete Batch** २०२४–२५ आणि युपीएससी पूर्वपरीक्षा २०२५ **Test Series Batch** : या वर्गातील ४९ जणांनी २५ मे रोजी युपीएससी पूर्व परीक्षा दिली. वर्षभर अभ्यास, सराव परीक्षा, उपक्रम, समुपदेशन सत्रे पूर्ण करून हा वर्ग संपन्न झाला. ११ जून रोजी युपीएससी पूर्व परीक्षेचा निकाल लागला आणि या वर्गातील पाच जण उत्तीर्ण होऊन पुढील मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

## ❖ हराळी केंद्र

**कृषी तंत्र विद्यालय आणि शेती विभाग :**

**कृषी तंत्र विद्यालय :** कृषी विद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा होऊन नुकताच त्यांचा परीक्षेचा निर्णय जाहीर झाला. २९ पैकी २३ विद्यार्थ्यांनी पुढील वर्गासाठी प्रवेश घेतला आहे. ७४.७५% गुण मिळवून कु. अजय गायकवाड हा विद्यार्थी प्रथम आला आहे.

**महिला मेळावा आणि पाककला स्पर्धा :** ॲनेमिया प्रकल्पात जून महिन्यात प्रकल्पातील प्रत्येक गावात महिलांचा मेळावा, रक्त तपासणी आणि पाककला स्पर्धा घ्यायचे ठरले आहे. त्याप्रमाणे यातला पहिला मेळावा सौर ज्येष्ठ २७ (१७ जून) रोजी शिवनगर तांड्यामध्ये घेण्यात आला. ८५ महिलांनी या मेळाव्यामध्ये उस्फूर्त सहभाग नोंदवला आणि त्यातील ११ जणी पाककला स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. या वेळी नव्याने आणलेल्या 'न टोचता मोजता येणाऱ्या हिमोग्लोबिन मापक यंत्राद्वारे' सर्व उपस्थित महिलांची रक्त तपासणी झाली.

## ❖ कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

**औद्योगिक प्रशिक्षण :** आपल्या केंद्रातील लेथ मशिनचा कोर्स पूर्ण करून सीएनसी कोर्स साठी प्रवेश घेतलेले आठ विद्यार्थी 'कमवा व शिका' योजने अंतर्गत SEINUMERO NIRMAN PVT. LTD या कंपनीमध्ये प्रशिक्षण घेत आहेत. हे विद्यार्थी सीएनसीचा अभ्यासक्रम शिकत असताना त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करत आहेत.

**SEINUMERO NIRMAN PVT.LTD मध्ये प्रशिक्षणा साठी गेलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम** : शिवापूर केंद्रामधील मागील वर्षीच्या (२०२४-२५) विद्यार्थ्यांचा लेथ मशिन, इलेक्ट्रिकल व वेल्डर या तुकडीतील एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण झाला असून त्यांची अंतिम परीक्षा झाली. परीक्षेसाठी एकूण २५ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेचा निकाल जाहीर करून इलेक्ट्रिशियन (सात विद्यार्थी) व वेल्डर (दोन विद्याथी) व सीएनसी (दोन विद्यार्थी) कोर्स पूर्ण केलेल्या एकूण अकरा विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

**मणिपूर संगणक प्रशिक्षण :** संगणक वर्ग दुसरी तुकडी तामिंगलाँग मणिपूर येथे चालू होती. अंतिम परीक्षा घेतली आहे. एकूण अकरा विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांनी शिवापूर केंद्रातून बेसिक संगणक अभ्यासक्रम पूर्ण केल्या बद्दल प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. त्याचा वापर करून ते सहजरित्या नोकरी मिळवू शकतील. सौर ज्येष्ठ २० (१० जून) पासून आपण मणिपूर येथील Kangpokpi येथे तीन महिन्यांसाठी दूरस्थ संगणक प्रशिक्षण वर्ग-३ सुरू केला आहे. त्यामध्ये एकूण ३४ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत.

## ❖ चिपळूण उपक्रम केंद्र

सौर ज्येष्ठ २५, (१५ जून) रोजी आदरणीय संचालकांच्या उपस्थितीत चिपळूण स्थायी संपर्क केंद्राचा वर्षारंभ व प्रतिज्ञाग्रहण समारंभ संपन्न झाला. चिपळूण केंद्राचे सदस्य व हितचिंतक असे ६० जण उपस्थित होते. चिपळूण केंद्राच्या सदस्यांपैकी पाच जणांनी प्रथम आणि तीन जणांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. वर्षारंभ उपासनेनंतर चिपळूण केंद्राचे शके १९४७ चे कार्यसंकल्प सादर करण्यात आले. प्रतिज्ञाग्रहण समारंभाची प्रस्तावना श्री. आदित्यदादा शिंदे यांनी केली. त्यानंतर युनायटेड इंग्लिश स्कूलच्या ''गुरुकुल'' मधील मुलींनी ''शुभ्र सुगंधित'' हे पद्य सादर केले. प्रतिज्ञाग्रहण झाल्यानंतर आदरणीय संचालकांनी सर्वांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी चिपळूण स्थायी संपर्क केंद्र आता ''चिपळूण उपक्रम केंद्र'' असेल असे जाहीर केले.

## ❖ ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर

• गुरुवार सौर ज्येष्ठ २२ (१२ जून) रोजी २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. इयत्ता पाचवीच्या दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांनी डॉ. कोटणीस यांच्या स्मारकाला भेट देऊन त्यांच्या कार्याची माहिती जाणून घेतली. यावेळी पाचवीचे ७३ विद्यार्थी, चार अध्यापक आणि वर्ग अग्रणी उपस्थित होते.

**इतर विभाग**

**प्राणायाम वर्गातील ६५० जणींच्या विडी कामगार महिला मेळाव्यात १२५ जणींची देशसेवेची प्रतिज्ञा** - ज्ञान प्रबोधिनी सोलापूरतर्फे सोलापूर शहरातील नऊ प्रभागांमध्ये ४८ गटांमधून सुमारे ५५० महिला दररोज प्राणायाम करतात. यात मुख्यत: विडी कामगार महिला आहेत. विडी कामगार महिलांचे आरोग्य उत्तम राहावे व त्यांचे संघटन व्हावे हा प्राणायाम प्रकल्पाचा उद्देश आहे.

रविवार सौर ज्येष्ठ १८ (८ जून) रोजी दु. ३.०० ते ६.०० या वेळेत या सर्व गटातील सदस्यांच्या एकत्रीकरणासाठी व स्त्री शक्तीच्या दर्शनासाठी महिला स्नेहमेळावा नागनाथ सांस्कृतिक भवन, सुनील नगर, सोलापूर येथे आयोजित केला होता. यामध्ये सुमारे ६०० महिला सहभागी होत्या. ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीशराव बापट हे यावेळेस उपस्थित होते. १२५ महिलांनी मा. संचालकांकडून आयुष्यभर देशसेवा करण्याची प्रतिज्ञा घेतली. • **सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.**

**अंकुर प्रकल्पातील मुला- मुलींचा नववर्षारंभ मेळावा** - भटके विमुक्त जमातीतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया पक्का करण्यासाठी गतवर्षी तीन ठिकाणी विनाशुल्क वर्ग झाले. दररोज एक तास वर्ग चालत होता. या वर्षी देखील ते वर्ग सुरू ठेवत आहोत. वर्ग १. तळे हिप्परगा - (पारधी, गोसावी, मातंगी समाजातील विद्यार्थी) २. माशाळ वस्ती - (बहुरूपी व लमाण समाजातील विद्यार्थी), ३. सोरेगाव - (नंदी व बहुरूपी समाजातील विद्यार्थी) या ठिकाणी हे वर्ग चालतात. या मुलांसाठी ज्ञान प्रबोधिनी सोलापूरच्या उपासना मंदिरात वर्षारंभ मेळावा संपन्न झाला. तीन ठिकाणाहून २८ मुली व २५ मुले असे एकूण ५३ विद्यार्थी उपस्थित होते.

**संस्कार, साहस आणि सर्जनशीलतेचा संगम - किशोर व किशोरी विकास शिबिर** - सोलापूर शहरातील पाच भागांमध्ये विडी कामगार कुटुंबातील इ. ८वी ते १०वीतील मुला-मुलींसाठी दर रविवारी दोन तास किशोर व किशोरी विकासिका असते. या मुलांसाठी किशोर व किशोरी विकास शिबिर झाले. या शिबिरात - साहस प्रशिक्षण, विद्याव्रत स्मरण व राष्ट्रअर्चना, व्यायाम, उपासना, खजिना शोध, हस्तकौशल्य तसेच प्रबोधिनीचे संस्थापक संचालक कै. विनायक तथा आप्पा पेंडसे यांच्या जीवनातील निवडक कथांचे वाचन व कथन अशी सत्रे झाली.

## ❖ ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र

**शुभारंभ -** सेंद्रिय खतांचा वापर जास्तीत जास्त होऊन रासायनिक खतांचा वापर समाजाने कमी करावा म्हणजे आरोग्यावर व शेतांमध्ये, परस बागा, कुंड्यामध्ये त्याचा चांगला परिणाम दिसेल, या उद्देशाने विद्यालयात गांडूळ खत निर्मितीचा प्रकल्प उभा करण्याचे ठरले. इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राइड यांच्या सहकार्याने विद्यालयात गांडूळ खत प्रकल्प उभारण्यास सहकार्य मिळाले. यामध्ये सेंद्रिय खत निर्मिती आणि विक्री होणार आहे.

(पान क्र. ७ व ८ या पानांवरील छायाचित्रांना त्यासंबंधीचे वृत्त जोडले आहे. छायाचित्राला स्पर्श केल्यास वृत्त वाचता येईल.)

# सौर ज्येष्ठ १९४७ मधील प्रकाशचित्रे



युवक विभाग राजगड मोहीम



संत्रिका – मातृभूमी पूजन



त्रिदशकपूर्ती कार्यक्रम, वेल्हे



आचार्यव्रत शिबिर



क्रिटिकल थिंकींग कार्यशाळा – DISOM



विकासमित्र प्रकल्प – निवासी अभ्यास शिबिर



मा. संचालकांसमवेत चिपळूण उपक्रम केंद्र सदस्य



भावली (खु.) – इगतपुरी – उद्घाटन कार्यक्रम



देहरादून–जयपूर अधिकारी भेटी आणि मेळावे २०२५



हराळी – कल्पना चित्राच्या मदतीने नियोजन कौशल्य शिकताना



श्री प्रकाश रणनवरे यांना महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कार



निगडी – अध्यापक प्रशिक्षण शिबिर



सोलापूर – महिला स्नेहमेळावा



शैक्षणिक उपक्रम संशोधिका – कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर